# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**

प्रेस नोट क्र-१८७ दिनांक - १४/०५/२०२४

## २७ वर्षापासुन खुनाच्या गुन्हयांत फरारी असलेल्या आरोपीतास अटक करण्यात गुन्हे शाखा कक्ष-१, काशिमीरा यांना यश

दिनांक ०५/१०/१९९७ रोजी सकाळी १२.०० वाजता अगर त्यासुमारास भाईंदर पुर्व एम.आय. उद्योगनगर, वासुदेव इंडस्ट्रीयल इस्टेट, गाळा नं. बी/१५, येथे विजयसिंग व त्याचे दोन साथीदार रा. साईसागर बिल्डींग, रुम नं. २१६, सी विंग, भाईंदर यांनी गटारात प्लास्टीक पिवशीतुन बिल्डींगवरुन कचरा टाकला त्यामुळे फिर्यादी व त्यांचे साथीदार यांचे अंगावर खराब पाणी उडुन , त्या वरुन बोलाचाली व धक्काबुक्की करुन १२.०० वाजण्याचे सुमारास धरमनाथ रामशंकर पांडे यांचे डोक्यात बांबुचा फटका मारुन जबर दुखापत करुन जिवे ठार मारले म्हणुन फिर्यादी श्री प्रमोदकुमार सुताराम पांडे वय-२४ वर्षे, धंदा नोकरी, रा. गाळा नं. १४ /ए, एम.आय. उद्योग, वासुदेव इस्टेट अभिनव विद्या मंदीर समोर, केबीन क्रॉस रोड, भाईंदर (पु.) यांनी दिले फिर्यादी वरुन भाईंदर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नंबर I ४३५/१९९७ भा.दं.वि.कलम ३०२,५०४,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला होता. सदर गुन्हयांचे मा. न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आलेले असुन त्याचा सेशन केस नं. १०/१९९८ असा आहे.

सदर गुन्हयात आरोपीत नामे १) विजयसिंग श्रीरामचंद्र चौहाण रा. नर्मदा कुंज ए/२०९, सी विंग, कॅबीन रोड, भाईंदर पुर्व. मुळ रा. गांव जबकीबलेपुर पो. गोपालपुर तो, टनलगंज जि. आझमगढ, राज्य यु.पी. पोस्टे मेंहनगर यांस दिनांक ०५/१०/१९९७ रोजी १९.३० वाजता अटक करण्यात आलेले होते. सदर गुन्हयांत १) मेवालाल ऊर्फ पन्नालाल मुरत चौहाण मुळ रा. गांव नोनरा, ता. लालगंज पो.स्टेशन मेहनगर जि. आजमगढ, २) राजेंद्र रामदुलार पाल रा. गाव पोस्टे हलिया पो. लालंगज , जिल्हा मिर्झापुर (यु.पी.) (संशयीत) हे पाहीजे आरोपीत आहेत.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तलयातील गंभीर व क्लिष्ट स्वरुपांचे खुनाच्या गुन्हयांतील पाहीजे व फरारी आरोपीतांचा शोध घेणे बाबत मा. पोलीस आयुक्त सो यांनी आदेशीत केले होते. गुन्हे शाखा कक्ष-१, काशिमिराचे अधिकारी व अंमलदार यांचे तपास पथक सदर गुन्हयांतील पाहीजे आरोपीत यांचा शोध घेत होते. तपासात सदर गुन्हयातील पाहीजे आरोपीत मेवालाल ऊर्फ पन्नालाल मुरत चौहाण यांचा त्याचे रहाते पत्त्यावर शोध घेत असतांना पो.हवा. पुष्पेंद्र थापा यांचे गुप्त बातमीदार यांनी माहीती दिली कि, आरोपीत मेवालाल ऊर्फ पन्नालाल मुरत चौहाण हा सध्या दिल्ली येथे रहात आहे. त्या अनुशंगाने आरोपीत याची माहीती प्राप्त करुन आरोपीत मेवालाल ऊर्फ पन्नालाल याचा शोध घेतला असता तो दिल्ली येथे मिळुन

आला आहे. त्यास दिनांक १२/०५/२०२४ रोजी २३.०० वाजता ताब्यात घेवुन विचारपुस करता त्याने आपले नांव पन्नालाल राममुरत चौहाण मुळ रा. ग्राम नोरणा पोस्ट गोपालपुर, पोलीस स्टेशन मेहनगर, तहसिल लालगंज, जिल्हा आजझमगढ, राज्या उत्तर प्रदेश सध्या राहणार- खस्सा नंबर १६/०३, गल्ली नं. १४, जे ब्लॉक स्परुप नगर, दिल्ली राज्य उत्तर प्रदेश असे सांगीतले आहे.

आरोपीत पन्नालाल राममुरत चौहाण यांचेकडे केलेल्या चौकशीमध्ये आरोपीतांनी गुन्हा केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. आरोपीत याचा मा. मेट्रोपोलीटन मॅजीस्ट्रेट, नॉर्थ ड्रिस्ट्रीक्ट रोहीणी कोर्ट, नवी दिल्ली यांचे न्यायालयातुन ट्रान्झीट रिमांड घेवुन आरोपीतास पुढील कारवाई कामी भाईंदर पोलीस ठाणे येथे हजर करण्यात आलेले आहे.

सदरची कामगीरी मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे मा. श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप-आयुक्त गुन्हे, मा. श्री. मदन बल्लाळ, सहा. पोलीस आयुक्त साो, गुन्हे शाखा, यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा कक्ष १ काशिमीरा येथील पो.नि. अविराज कुराडे, स.पो.नि.प्रशांत गांगुर्डे, स.पो.नि.पुष्पराज सुर्वे, पोलीस उप-निरीक्षक राजु तांबे, सहाफौज संदीप शिंदे, पो.हवा./पुष्येंद्र थापा, पो.हवा. अविनाश गर्जे, पोहवा/सुधीर खोत, पो.हवा./सचिन हुले मसुब किरण असवले, सपोउपनिरी संतोष चव्हाण, सायबर विभाग यांनी केली आहे.



--------------00000------------